स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

२० वर्षे
भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

### पूजा ज्ञानेश्वर मडके हिने 90 % गुण घेऊन मिळवला प्रथम क्रमांक



गेवराई : राजमाता जिजाऊ विद्यालय भोगलगाव शाळेतुन पूजा ज्ञानेश्वर मडके 90 .00 % हिचा प्रथम क्रमांक आला आहे त्याबद्दल . शाळेचे मुख्यध्यापक, क्षिक्षक वृंद तसेच गावातील सरपंच, मित्र मैत्रिण, आई- वडिल, मामा व सर्व नातेवाईक यांच्याकडून पूजा मडके हिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे . दरम्यान पूजाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत .

### मुदत उलटून गेल्यानंतरही माहिती न दिल्याने केले अपिल

➤ भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक कातखडे यांनी 18 नोव्हेंबर 2022 रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक विभागाकडे सन 2018-19 च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांतील खर्चाचा तपशील मागवला होता .

➤ मात्र, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कायद्यात नमूद असलेली 30 दिवसांची मुदत उलटून गेल्यानंतरही माहिती न दिल्याने त्यांनी प्रथम अपील आणि नंतर द्वितीय अपील दाखल केले .

### या प्रकरणात मोठ्या आर्थिक अनियमितता झाल्याचा संशय

➤ या निर्णयाच्या अनुषंगाने दिलीप गावडे, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक 15 मे 2025 रोजी बीडचे तत्कालीन उपजिल्हा निवडणूक अधिकारी संतोष राऊत यांच्याविरुद्ध शिस्तभंग कारवाईसाठी पत्र जारी केले आहे .

➤ या संपूर्ण प्रकरणात मोठ्या आर्थिक अनियमितता झाल्याचा संशय असून, याप्रकरणात सहभागी अधिकाऱ्यांविरुद्ध लवकरच न्यायालयात याचिका दाखल होणार असल्याची माहिती आहे . त्यामुळे जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली .

## चोरी उघडी पडण्याची भिती?

# निवडणुक खर्चाचा तपशील न देणाऱ्या उपजिल्हाधिकारी राऊतांवर नामुष्की!!

### विभागीय आयुक्तांकडून उपजिल्हाधिकारी संतोष राऊत यांच्यावर शिस्तभंगाच्या कारवाईचे आदेश

**भ्रष्टाचार निर्मूलन समिती मराठवाडा अध्यक्ष अशोक कातखडे यांच्या तक्रारीची गंभीर दखल**


**निवडणुकीतील खर्चाच्या तपशील प्रकरणात मोठी आर्थिक अनियमितता झाल्याचा संशय**

**या प्रकरणात सहभागी अधिकाऱ्यांविरुद्ध लवकरच न्यायालयात याचिका होणार दाखल**

बीड : प्रतिनिधी
माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत बीडचे तत्कालीन उप जिल्हा निवडणूक अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी संतोष राऊत यांना लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या खर्चाचा तपशील देण्यात यावा, अशी माहिती माहिती अधिकारात भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक कातखडे यांनी मागवली होती. परंतु, त्यांना ही माहिती देण्यास संतोष राऊत यांनी दिरंगाई केली. दरम्यान अशोक कातखडे यांच्या तक्रारीची विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी गंभीर दखल घेऊन संतोष राऊत यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. एकंदरीत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातील चोरी उघडी पडू नये म्हणून की काय निवडणुकीतील पैशांचा तपशील देण्यास दिरंगाई केली असावी, अशी चर्चा आता या निमित्ताने ऐकवास मिळत आहे.



अशोक कातखडे,
अध्यक्ष भ्रष्टाचार निर्मूलन समिती, मराठवाडा



### सुनावणीला येण्यास टाळाटाळ; कायद्याचे उल्लंघन केल्याने दिले कारवाईचे आदेश

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनीही विहीत 45 दिवसांच्या मुदतीत आदेश न देता सुनावणीला येण्यासाठी टाळाटाळ केली . यानंतर कातखडे यांनी 21 मार्च 2023 रोजी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर येथील खंडपीठात दाखल केला . त्यानंतर राज्य माहिती आयोगाने 21 नोव्हेंबर 2023 रोजी या प्रकरणात सुनावणी घेतली . सुनावणीलाअशोक कातखडे स्वत : हजर होते . परंतु संबंधित जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी गैरहजर होते . आयोगाने त्यांच्या अनुपस्थितीची गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांनी कायद्याचे उल्लंघन केल्याचे नमूद करत त्यांच्यावर कारवाईचे निर्देश दिले आहेत .

## धनंजय मुंडे यांच्या मागणीला यश!

### सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासह नवीन संच उभारणीचा प्रस्ताव सादर करा : अजित पवार

### वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाच्या कामांना निधीची कमतरता भासणार नाही कामे दर्जेदार पद्धतीने वेळेत पूर्ण करा अजित दादांचे निर्देश

परळी : प्रतिनिधी
राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या परळी दौऱ्यात धनंजय मुंडे यांच्या एका महत्त्वाच्या मागणीला यश आले आहे . परळी येथील जुन्या औष्णिक विद्युत केंद्राच्या जागेत बंद असलेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेत नवीन मेगा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे यासह नवीन थर्मल मध्ये प्रस्तावित संच क्रमांक ९ ची उभारणी करणे, राख प्रदूषण नियंत्रण उपाययोजना जुन्या विश्राम



गृहाचे नूतनीकरण, संच क्रमांक ६ ते ८ साठी स्वतंत्र प्रशासकीय इमारत आदी मागण्याना सकारात्मक प्रतिसाद देत अजितदादा पवार यांनी याबाबत चे प्रस्ताव शासनास सादर करण्याचे ● पान ३ वर . . .

## अंशतः अनुदानित शाळा टप्पा वाढीची अंमलबजावणी पावसाळी अधिवेशनात : उपमुख्यमंत्री अजित पवार

बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीचे अजित पवार यांना निवेदन

बीड : दि . १४ ऑक्टोबर २०२४ च्या विनाअनुदानित आणि अंशत : अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करून येत्या पावसाळी अधिवेशनात भरीव आर्थिक निधीची तरतूद करून आमचा प्रलंबित असणारा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना . अजित पवार यांनी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या शिष्टमंडळाला दिले .

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना . अजित पवार हे काल दि .19 मे रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते . यावेळी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने राज्याचे अर्थमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना .अजित दादा पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन



देण्यात आले . या मध्ये प्रामुख्याने राज्यातील अंशत : अनुदानित शाळांना 14 ऑक्टोबर 2024 च्या शासन आदेध्याशानुसार वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीची तरतूद करावी अशी मागणी करण्यात आली . ● पान ३ वर . . .

## भाजपा मंत्री विजय शहांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा - गणेश बजगुडे पाटील

बीड : प्रतिनिधी
ज्या पाकिस्तानी अतिरेक्यांनी काश्मिरच्या पहेलगाम भागात निष्पाप भारतीयांवर हल्ला केला त्यात अनेक निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमावावा लागला . त्याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंधूर राबवत कर्नल सोफिया कुरैशी व पायलट व्योमिका सिंह यांनी पाकिस्तानातील दहशतवाद्यादी तळावर हवाई हल्ले करून दहशतवाद्यांचे समुळ नष्ट केले . अशा जाबाज सैनिकांच्या पराक्रम, शौर्याचे संपुर्ण भारतवासी कौतुक करत असताना मध्यप्रदेश सरकारमधील भाजपा मंत्री विजय शहा यांनी आम्ही अतिरेक्यांना मारायला त्यांचीच बहिण पाठवली म्हणत अतिशय बेताल व संतापजनक वक्तव्य करून भारतीय सैनिकांचा अवमान केलेला आहे .



कर्नल सोफिया कुरेशी या भारतीय असुन तमाम भारतीयांच्या त्या बहीण आहेत . परंतु त्या मुस्लिम आहेत म्हणुन त्यांना आतंकवादयाची बहीण म्हणणे हे अतिशय निंदनीय व खेदजनक आहे .

या वक्तव्याचा बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत अश्याप्रकरे बेताल वक्तव्य करणाऱ्या भाजपा मंत्री विजय शहावर देश द्रोहाचा गुन्हा दाखल करुन मंत्री मंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी काँग्रेसचे नेते तथा शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष गणेश दादा बजगुडे यांनी केले आहे .

## प्रहार पक्षाच्यावतीने शोले स्टाईल आंदोलन

कन्नड : विशाल भालेराव
मानवी जीवनाला भेडसावणारी समस्या म्हणजे फक्त शहरातील वाढणारा कचरा किंवा पिण्याच्या पाण्याचा तुटवडा नसून, या ही पलीकडे लोकांना स्वत :च्या न्याय हक्कासाठी शासन दरबारी फेऱ्या माराव्या लागतात.

दिनांक 19 मे रोजी कन्नड शहरात दिव्यांगांच्या न्याय हक्कासाठी पहिल्यांदाच शोले स्टाईलने आंदोलन करण्यात आल्याचे दिसून आले . ● पान ३ वर . . .



## पैठण तालुक्यात कामगारांना मोफत भांडे वाटप कॅम्पच्या नावाखाली मोठा स्कॅम !!

पैठण : सर्जेराव खडसन
महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे अधिकृत नोंदणी केलेल्या बांधकाम कामगारां साठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत . त्यामध्ये आरोग्य सेवा त्यांच्या पाल्यांना स्कॉलरशिप व ईतर अनेक योजना राबवल्या जातात . तसेच या योजनेत बांधकाम कामगारांना घरगुती वापरातील भांड्याचा संच मोफत वाटप करण्यात येत आहे . कामगारांसाठी असलेली ही योजना पुरती दलालांनी आपल्या हातात घेतली आहे . मागील चार ते पाच दिवसापासून शहरातील भाजीमार्केट परिसर, पोस्ट ऑफिस रोड, जूने पावर हाऊस तसेच बिडकीन लोहगाव, पिंपळवाडी ( पि ) सोनवाडी, तांदुळवाडी नाराळा या भागात जिल्ह्याच्या व तालुक्यातील काही तथाकथित कामगार संघटनेच्या दलालांनीभांडे वाटप करण्याच्या कॅम्पच्या नावाखाली थंब घेत लाखो रुपयांचा मोठा स्कॅम होत असल्याच्या तक्रारी काही लोकांनी बोलून दाखवल्या आहेत . ● सविस्तर वृत्त पान ३ वर . . .

ॲड. सुभाष राऊत ➤ भुजबळ साहेबांना मंत्रिमंडळात स्थान दिल्याबद्दल फडणवीसांचे आभार

# छगन भुजबळ यांनी घेतली मंत्रिपदाची शपथ

➤ धनंजय मुंडेंचे खाते मिळण्याची शक्यता; CM देतील ती जबाबदारी पार पाडण्याचा संकल्प

मुंबई : प्रतिनिधी
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा अखेर सरकारमध्ये प्रवेश झाला आहे . त्यांनी मंगळवारी सकाळी राजभवनात आयोजित एका छोटेखानी समारंभात कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली . राष्ट्रवादीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ओबीसींचे बडे नेते असणाऱ्या भुजबळांचा मंत्रिमंडळात स्थान दिले आहे . त्याचा पक्षाला मोठा लाभ होण्याची शक्यता आहे . मंत्री झाल्यानंतर भुजबळ म्हणाले - 'असे म्हणतात की, ज्याचा शेवट चांगला, त्याचे सर्व चांगले .' आतापर्यंत मी प्रत्येक जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडली आहे . आताही मला जी काही जबाबदारी मिळेल ती मी नेटाने पार पाडेन .




मुंबई : ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते, समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा . ना . छगनरावजी भुजबळ साहेब यांनी आज राजभवन येथे कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतली . यावेळी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड . सुभाष राऊत, प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे समाधान जेजुरकर, सदानंद मंडलिक आदी दिसत आहेत .

### मुख्यमंत्री देतील ती जबाबदारी पार पाडू- मंत्री छगन भुजबळ

मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर छगन भुजबळ म्हणाले की, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री जे खातं देतील त्या खात्याचा मंत्री म्हणून काम करणार आहे . मी असे कोणते खातं मागितले नाही . मी सर्व खाते सांभाळले आहे, आता ज्या खात्याची जबाबदारी दिली जाईल ती स्वीकारू, असे भुजबळांनी म्हटले आहे .

### बीड, नाशिकमध्ये भुजबळ समर्थकांचा जल्लोष

बीड आणि नाशिकमध्ये भुजबळांच्या समर्थकांनी फटाके फोडत मोठा जल्लोष केला . एकमेकांना पेढे भरवत ओबीसी नेतृत्वाला मंत्रिमंडळात घेत मानसन्मान दिला . आम्ही गेले अनेक दिवस ही मागणी करत होतो ती आज पूर्ण झाली आहे .



### भुजबळ नाराज नव्हतेच- तटकरे

सुनील तटकरे म्हणाले की, छगन भुजबळ नाराज होते असे काही नाही . यापूर्वी त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या . आम्ही सर्व जणांनी एकत्रित बसून छगन भुजबळ यांच्या मंत्रिपदाचा निर्णय घेतला आहे . पक्षाच्या काही भूमिका असतात त्यातून हा निर्णय झाला आहे .

# वृषभ, सिंह, तूळ, कुंभ राशीसह इतर राशींसाठी आजचा दिवस कसा असेल, जाणून घ्या

## मेष रास

मेष राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर उद्या या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

वृषभ राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु उद्या भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून उद्यापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास उद्या यशस्वी होईल.

## मिथुन रास

मिथुन राशीसाठी उद्याचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल.

## कर्क रास

कर्क राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. उद्या तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो.

## सिंह रास

सिंह राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण उद्या गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल.

## कन्या रास

कन्या राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. उद्या एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल.

## तूळ रास

उद्या, सोमवार तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी उद्याचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल.

## वृश्चिक रास

वृश्चिक राशीचे राशीचे उद्या तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका,अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल.

## धनु रास

उद्याचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर उद्या ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## मकर रास

उद्याचा दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. उद्या तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु उद्या कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. उद्या तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

कन्या राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## मीन रास

मीन राशीसाठी उद्याचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही उद्या यशाकडे वाटचाल कराल. उद्या व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर उद्या ती सुधारेल.


# 'पारबता' विरुध्द नियतीने मांडलेला खेळ !!

परिक्षण



● –भीमराव रायभोळे

यशोदीप पब्लिकेशन्स (पुणे) यांनी प्रकाशित केलेली 'छाया बेले' या लेखिकेची 'पारबता' नावाची कादंबरी वाचली. ही कादंबरी स्त्री शोषणावर आधारित असून या कादंबरीला वास्तवाचा पदर असल्याचे जाणवते. छाया बेले यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. (कादंबरीचं शेवटचं पान पहा). छाया बेले यांची कादंबरी मनाला भावली, त्यामुळे कादंबरीविषयी लिहिल्यावाचुन राहावलं नाही ! लिहिण्याची शैली, सुख–दु:खाचे प्रसंग रेखाटण्याचं कसब, कथानक योग्य मार्गाने पुढे जाईल याची घेतलेली काळजी, प्रसंगानुरूप ग्रामीण म्हणींचा केलेला वापर आणि त्या परिसरातील लेखिकेने वापरलेली ग्रामीण भाषा ह्या कादंबरीची खास वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळेच ही कादंबरी दर्जेदार आणि वाचनीय झाली आहे. ह्या कादंबरीचं कथानक उदगीर–लातूर भागात घडल्याचं जाणवतं. 'पारबता' ह्या कादंबरीतील नायिकेने लेखिकेच्या काळजात खोल जखम केल्याचं जाणवतं. त्यामुळे नायिकेने जरी प्रत्यक्षात हालअपेष्टा, यातना भोगल्या, आणि शेवटी त्यामुळेच तिने अखेरचा श्वास घेतला. तिचं दु:ख आणि वेदना लेखिकेला सतत छळतात, म्हणूनच लेखिका म्हणते, "तुमच्या भोवतालच्या पारबताला जगण्याचे बळ द्याल. तिच्या वाट्याला कादंबरीतील पारबताचं दु:ख येणार येणार नाही अशी काळजी प्रत्येकाने घ्यावी." खरं तर पारबतानं जे दु:ख भोगलं त्याला इथली स्त्रीचं शोषण करणारी समाज व्यवस्था कारणीभूत आहे. कालानुरूप यात काहीअंशी बदल झाला असला, तरी इथल्या पुरूषसत्ताक समाजाची आजही तीच मानसिकता आहे. ग्रामीण भागात ही मानसिकता मोठ्या प्रमाणात आजही टिकून आहे. आजही कित्येक पारबता मानसिक छळाला सामोरे जावून जीवघेणं जीवन जगत आहेत. डोळ्यांसमोर अशी उदाहरणे आहेत की, सासरच्या जाचाला कंटाळून त्यांनी आयुष्य संपविलं आहे. मुलगी दहा–बारा वर्षाची झाली की, एकदाचं तिचं लग्न करून मोकळं व्हायचं, हा येथील व्यवस्थेचा भाग आहे, मग तिच्यासाठी निवडलेलं स्थळ योग्य की अयोग्य, नवरा समवयस्क आहे की,



आरदपराया, शिक्षित आहे की अडाणी आहे, ही व्यवस्था पाहात नाही. हेच पारबताच्या बाबतीत घडलं आहे. लग्नाच्या नंतर ती आपल्या आई–वडिलांच्या कुटुंबाचा भाग नाही म्हणून जो काही तिला त्रास होत आहे, तिचं दु:ख आहे ते तिनेच भोगलं पाहिजे, ही आईवडिलांची मानसिकता तर आहेच, तिच्या प्रति त्यांची उदासिनतादेखील आहे, कारण ते देखील या व्यवस्थेचे घटक आहेत. नायिकेचे आई–वडील किंवा भाऊ दोन दोन वर्ष तिला भेटत नाहीत अशी त्यांच्याकडे ती खंत व्यक्त करते. तिच्यामागे तिला पाठबळ देणारे कोणी नाही, हे सासरी समजलं की ते तिचा छळ होणारच ! पारबताच्या वडिलांना कोणी स्थळ सुचवतं आणि त्याची शहानिशा न करताच तिचं वय परिपक्व नसूनही त्यांनी तिचं लग्न केलं. मग तिच्या वाट्याला आलं ते जीवघेणं जीवन ! सासरमध्ये– घरात आणि शेतात गुलामाप्रमाणे राबराब वागूनही क्षुल्लक कारणासाठी नवरा आणि सासरा तिच्यावर अमानुष अत्याचार करतात. स्त्रीच्या वाट्याला मानहानी, शिवीगाळ, यातना येतात त्याचं दुसरं कारण आहे तिला मुलगा न होणं. हेच पारबताच्या जीवघेण्या दु:खाचं अजून एक आणि मुख्य कारण आहे. आणि त्यामुळे आपण कुठेतरी कमी आहोत असा न्युनगंड तिच्या मनात आहे म्हणून ती मानहानी मुकाट्याने सहन करते. मुलगा झाला म्हणून कादंबरीतील कोंडा नावाच्या स्त्रीला जो मान मिळतो, तसा सुंदर, सुशील, सोशीक पारबताला मिळत नाही. "पोरगं झालं असतं तर गेलो असतो बगायला, पोरगी झाल्याय, तिला काय बघायला जावं ?" सासऱ्याचं हे म्हणणं बाळंतीन पारबताच्या काळजाला छिद्र पाडतं. पारबताला घर, नवरा, सासरा, जनावरे आणि शेत हे सर्व तिचं स्वत:चं वाटतं. आपल्या माघारी घराचं, जनावरांचं, नवऱ्याचं आणि सासऱ्याचं काय होईल या काळजीने ती माहेरी राहणं पसंत करीत नाही, मात्र सासरच्या लोकांसाठी ती केवळ मन नसलेलं–राबणारं यंत्र ! पायात चप्पल नाही, हातात बांगड्या नाहीत किंवा अंगावर चांगल लुगडं नाही. यापेक्षा अजून तिची काय दैना असावी ? नवरा रक्तपितीमुळे जर्जर असतानादेखील ती त्याला नाकारत नाही, तर त्याचा इलाज करण्यासाठी धडपडते ह्याला तर तोड नाही. त्याला सोडून स्वतंत्र जीवन जगावं असं तिच्या मनाला शिवत नाही. ती त्याला दुरूस्त करते, आणि तो कृतघ्नतेने तिच्या न कळत दुसरी बाई घरात घेऊन येते. पारबताने तिने जे दु:ख भोगलं, यातना, अत्याचार, मानहानी कुरकुर न करता, आपल्या आईवडिलांना न सांगता सहन केली त्याला सीमा नाही, शेवटी हा ही प्रश्न उरतो की, तिने एवढ्या हालअपेष्ठा का सहन केल्या ? कादंबरीच्या मलपृष्ठावर ले. मारोती कसाब यांनी लिहिल्याप्रमाणे मलाही असं वाटतं की, पारबताचा अतिसोशिकपणा तिच्या दु:खाला कारणीभूत ठरला. माणूस एवढा सोशिक का असावा हे मात्र पारबताच सांगू शकली असती. खरं पाहिलं तर पारबताचा हा जीवनसंघर्ष नव्हताच नियतीने तिच्याविरोधात मांडलेला खेळ होता ! पारबताचे दु:ख हे जरी प्रातिनिधिक असलं, तरी या कादंबरीच्या निमित्ताने लेखिका छाया बेले यांनी समस्त स्त्री जातीचे प्रश्न आणि दु:ख उजागर केले आहेत, अतिसोसिकपणा किंवा अतिविद्राहीपणा टाळून जणू मध्यम मार्ग चालण्याचा त्यांनी या कादंबरीद्वारे संदेश दिला आहे. वाचक नक्कीच या कादंबरीचे स्वागत करतील. समाजातील वाईट रुढी, परंपरा, येथील वंचितांचे, सोशिकांचे प्रश्नावर त्या यापुढे लिहित राहतील असी आशा बाळगतो !

➤परिक्षण : भीमराव रायभोळे,
(निवृत अधिकारी–भारतीय आर्थिक सेवा)
➤E-mail : raibhole.bhimrao@gmail.com
➤मो. ९७६७२१५८८१

➤पारबता– कादंबरी
➤लेखिका– छाया बेले
➤प्रकाशन– यशोदीप पब्लिकेशन्स्, पुणे
➤पृष्टे–२४०
➤किंमत– रू. ३५०


# तर पानिपतचा इतिहास वेगळा असता...

विशेष

● अशोक दोडताले

इंदोर च्या होळकर घराण्याचे संस्थापक .घराणेशाहीचा कसलाही वारसा नसताना केवळ स्वकृत्व व पराक्रमाने पुढे येत मराठेशहीच्या राजगड्याचे एक चाक बनलेले धोरणी, मुत्सद्दी व झुंजार लढवय्ये श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांना इतिहासकारांनी दुर्लक्षितच केले. आज त्यांची पुण्यतिथी या निमित्त त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचा अल्पसा प्रयत्न........

दऱ्याखोऱ्यात, रानोमाळ भटकणे ज्यांच्या पाचवीला पुजलेले,अशा भटक्या विमुक्त समाजात धनगर कुटुंबात मल्हाररावांचा जन्म झाला .खंडोजी वीरकर चौगुला हे त्यांचे वडील. होळ या गावी त्यांचा मुक्काम पडलेला असतानाच दि. १६ मार्च १६९३ रोजी मल्हारराव यांचा जन्म झाला .या गावा मुळेच त्यांना होळकर नाव चिकटले .मल्हारराव लहान असतानाच वडिलांचे छत्र हरपले. मल्हारराव पोरके झाले. भाऊबंदकी चा त्रास वाढला ;म्हणून मायलेकांनी मामाचा आश्रय घेतला. तळोदा येथील भोजराज बारगळ हे मल्हाररवांचे मामाश्री. मामाच्या आश्रयात वाढलेल्या मल्हाररवांनी दाभाड्यांच्या सैन्यातील एक सरदार असणाऱ्या कंठाजी कदमबांडे यांच्या पेंढारी टोळीत एक सामान्य शिपाई म्हणून आपली कारकीर्द सुरू केली .मल्हार यांच्या अंगी असणारी नेतृत्व क्षमता , साहस, मुत्सद्दीपणा, धाडस,पराक्रम या गुणामुळे लवकरच त्यांचे नाव झाले .थोरले बाजीराव पेशवे यांचे ही त्यांनी लक्ष वेधून घेतले .आपल्या अंगी असणाऱ्या नेतृत्व गुणांची कसोटी लावत त्यांनी उत्तर भारतात मराठ्यांची सत्ता प्रस्थापित करण्यास सुरुवात केली .याची बक्षिसी म्हणून १७२९ मध्ये माळव्याची सुभेदारी मिळाली. एक सामान्य शिपाई सुभेदार झाला ! त्यांनी कारकिर्दीत कित्तेक लढाया केल्या. निजामाचा १७३७ मध्ये ताल भोपाळ येथे केलेला दणदणीत पराभव, १७३९ मध्ये पोर्तुगिजांकडून हिरावून घेतलेली वसई, १८४८ मध्ये रोहील्यांचा केलेला बीमोड या काही त्यांच्या गाजलेल्या लढाया .चार पेशव्यांची कारकीर्द त्यांनी जवळून पाहिली .त्यांचे बहुतांश जीवन रणमैदान गाजवन्यातच गेले. म्हणूनच होळकरांना मराठेशहीचे एक चाक म्हणून ओळखले जाते. उत्तर भारतात त्यांनी मराठ्यांचे चांगलेच प्रस्थ वाढवले. पराक्रमी मल्हाररावांचा उत्तरेत एवढा धाक होता की, 'मल्हार आया.' हा आवाज कानी पडताच अख्खे गाव चिडीचूप होत असे. होळकर व शिंदे या जोडगोळीच्या असामान्य पराक्रमामुळे च मराठेशाहीचा झेंडा अटकेपार फडकला. दुर्दैवाने त्याचे श्रेय मात्र इतिहासकारांनी राघोबांना देण्यात धन्यता मानली.



उत्तर हिंदुस्थान आपल्या घोड्यांच्या टापांखाली तुडवून काढणारे मल्हारराव

व राणोजी शिंदे हे जिवलग मित्र ! यांच्या पराक्रमामुळे पातशाही चे सर्व सरदार, वजीर दोघांना टरकून असत. अब्दालीच्या आक्रमणापासून मराठेच पातशाहीचे रक्षण करू शकतात, असा विश्वास पातशहाच्या मनात निर्माण झाला. अन् अब्दालीने केलेल्या तिसऱ्या स्वारीनंतर बिथरलेल्या पातशहाने आपल्या सफदरजंग या वजीरा मार्फत कन्नोज येथे होळकर – शिंदे यांच्याशी दिल्ली तख्ताच्या रक्षणाचा ऐतिहासिक करार केला. तो दिवस होता २७ मार्च १७५२. होळकर–शिंदे यांच्या पराक्रमाने प्रभावित झाल्यानेच पातशहाने हा करार केला होता .बुराडी घाटावर दत्ताजी शिंदे एकाकी झुंजत असताना तुकोजीराव होळकरांना त्यांच्या मदतीसाठी ससैन्य पाठवून मल्हाररावाने आपल्या विशाल हृदयाचे दर्शन घडवले. मराठेशाही साठी आपल्या हाडांची काडं अन् रक्ताचं पाणी करनाऱ्या या महान योध्दयाची इतिहासाने उपेक्षाच केली.

पानिपतमध्ये मराठ्यांचा पराभव झाला असला तरी मल्हाररावांनी पुन्हा सैन्य गोळा करून मोहिमा सुरू केल्या व याची परिणती म्हणून उत्तरेतील मराठ्यांचा धाक कमी झाला नाही. काही काळाने उत्तर भारतात पुन्हा मराठ्यांचा झेंडा डौलाने फडकला. त्यात मल्हाररावांचे मोठे योगदान ! उल्लेखनीय बाब ही की पानिपतच्या युद्धा पूर्वीच १३ मार्च १७६० रोजी मल्हाराव होळकर यांनी अब्दालीशी तह करून त्यास परत पाठवायची तजवीज केली होती. मात्र, तोवर भाऊसाहेब पेशवे उत्तरेत असल्याचे समजले अन् नजीबाच्या आग्रहाखातर अब्दाली येथेच थांबला आणि पुढचा अनर्थ घडला. केवळ मराठ्यांच्या नशिबात विजय नव्हता म्हणूनच मल्हाररावांचा मुत्सद्दीपणा कामी आला नाही. नाही तर इतिहास काही वेगळाच राहिला असता ! अशा मुत्सद्दी, पराक्रमी, झुंजार लढवय्या सुभेदार श्री मल्हारराव होळकर यांची आज पुण्यतिथी .या निमित्त त्यांच्या पावन स्मृतीस महा जागरण परिवाराकडून मानाचा मुजरा !

# मिथुन चक्रवर्तीला बीएमसीकडून कारणे दाखवा नोटीस, अनधिकृत बांधकाम प्रकरणी येणार अडचणीत !



मुंबई : मुंबई महानगरपालिकेने बॉलिवूड स्टार मिथुन चक्रवर्ती यांना नोटीस बजावली आहे. मुंबई महानगरपालिका कायद्याच्या कलम ४७५अ अंतर्गत त्यांच्यावर खटला चालवण्याचा इशारा देण्यात आला आहे. नेमकं काय प्रकरण आहे ? जाणून घेऊया.

बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने (बीएमसी) मिथुन चक्रवर्ती यांना त्यांच्या मालाड येथील ग्राउंड आणि मेझानाइन मजल्यांचे अनधिकृत बांधकाम केल्याबद्दल कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे. मेझानाइन फ्लोअर हा एक आंशिक फ्लोअर असतो, जो सहसा दोन मजल्यांमधील असतो. ज्याचे अनधिकृत बांधकाम केल्यासंदर्भात बीएमसीने मिथुन चक्रवर्ती यांना नोटिस बजावली आहे. ज्यावर मिथुन चक्रवर्ती यांनी बांधकाम अनधिकृत नसल्याचे सांगितले आहे.

मिथुन चक्रवर्ती यांनी या संदर्भात आपली बाजू स्पष्ट केली आहे. त्यांना मालाडमधील एरंगल येथे सुरू असलेल्या बीएमसी मोहिमेचा एक भाग म्हणून नोटीस मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, ' माझे कोणतेही बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकाम नाही. इथे सर्वांना नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत, आम्ही त्यांना उत्तर देत आहोत."

नोटिसमध्ये काय नमूद करण्यात आले आहे ?

१० मे रोजी जारी केलेल्या कारणे दाखवा नोटीसनुसार, मुंबई महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामासाठी मुंबई महानगरपालिका कायद्याच्या कलम ४७५अ अंतर्गत खटला चालवण्याचा इशारा दिला आहे. कलम ४७५अ मध्ये कोणतेही अनधिकृत बांधकाम न काढल्यास दंड आकारला जातो. या सूचनेत दोन तळमजल्यावरील मेझानाइन लेव्हल युनिट्स आणि तीन तात्पुरत्या १०x१० युनिट्सचा उल्लेख आहे, जे विटांच्या दगडी भिंती, लाकडी फळ्या, काचेचे विभाजन आणि एसी शीट सीलिंगच्या मिश्रणाचा वापर करून बांधले गेले आहे. नागरी अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या भूखंडावरील बांधकामे सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी न घेता उभारण्यात आली आहेत. या नोटीसमध्ये, बीएमसीने मिथुन चक्रवर्ती यांना "ही इमारत किंवा काम का काढून टाकले जाऊ नये किंवा बदलले जाऊ नये किंवा पाडले जाऊ नये किंवा जागेचा वापर पूर्ववत का केला जाऊ नये" याचे समर्थन करण्यास सांगितले आहे." याचे उत्तर देण्यासाठी सात दिवसांची वेळ दिली आहे. जर कारण पुरेसे नसेल तर इमारत मालकाच्या जोखमीवर आणि खर्चावर पाडली जाईल असे नोटीसमध्ये म्हटले आहे. शिवाय, बीएमसीने इशारा दिला आहे की, दोषी व्यक्तीवर खटला देखील चालवला जाऊ शकतो. पालिकेच्या कारवाईच्या कलम ४७५अ नुसार, हे कृत्य दंड आणि तुरुंगवासाच्या शिक्षेस पात्र आहे.



## ज्योती मल्होत्रानंतर आणखीन एक युट्यूबर पाकिस्तानची हेर?

### पाकिस्तानसाठी हेरगिरी प्रकरणी युट्यूबर प्रियंका सेनापतीची चौकशी

नवी दिल्ली : हरियाणातील हिसारमध्ये युट्यूबर ज्योती मल्होत्राच्या बाबतीत आता ओडिशा कनेक्शनही समोर आले आहे. केंद्रीय गुप्तचर संस्था इंटेलिजेंस ब्युरो (IB) आणि पुरी पोलिसांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे, या प्रकरणाचा तपास आता पुरीपर्यंत पोहोचला आहे. कारण ओडीशा मधील पुरी येथील युट्यूबर प्रियांका सेनापती हिच्यावर देखील पाकिस्तानसाठी हेरगिरी प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्योती मल्होत्रा सप्टेंबर 2024 मध्ये ओडिशाच्या पुरीला गेली होती. या काळात तिने जगन्नाथ मंदिर आणि त्याच्या सभोवतालच्या सरकारी परिसराचे फोटो आणि व्हिडिओ बनवले होते. सुरक्षा यंत्रणांना संशय आहे की या ठिकाणांची माहिती डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे पाकिस्तानमधील कार्यकर्त्यांना पाठवण्यात आली होती. या काळात ज्योती प्रियंका सेनापतीला भेटली किंवा तिच्या ● पान ३ वर ...

· सांज दैनिक बीड · वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# ज्योती मल्होत्रानंतर आणखीन एक युट्यूबर पाकिस्तानची हेर?

● पान २ वरून . . . संपर्कात होती असाही तपास यंत्रणांना संशय आहे . ज्योती मल्होत्रा आणि प्रियंका सेनापती यांच्यात संशयास्पद संबंध समोर आल्यानंतर आयबीने पुरी पोलिसांच्या सहकार्याने तपास सुरू केला आहे .

## प्रियंका सेनापती ज्योती मल्होत्राच्या संपर्कात

ज्योतीने जगन्नाथ मंदिर आणि जवळच्या सरकारी आस्थापनांसह अनेक महत्त्वाच्या ठिकाणांचे फोटो आणि व्हिडिओ टिपले होते . या ठिकाणांवरील संवेदनशील प्रतिमा आणि डेटा परदेशी कार्यकर्त्यांना पाठवला जाऊ शकतो . या प्रकरणाच्या चौकशीच्या संदर्भात, आयबी अधिकाऱ्यांनी पुरीची युट्यूबर प्रियंका सेनापती हिची चौकशी केली आहे . चौकशीच्या कक्षेत आल्यानंतर प्रियांका सेनापतीने सोशल मीडियावर लाईव्ह येऊन आपली भूमिका स्पष्ट केली आहे .

## सोशल मीडियाद्वारे प्रियंकाने स्पष्ट केली बाजू



युट्यूबर ज्योती मल्होत्रासोबत संपर्कात आल्याने, प्रियांकावर देखील पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे . यासंदर्भात केल्या गेलेल्या चौकशीनंतर, प्रियांकाने सोशल मीडियावर लाईव्ह द्वारे आपली बाजू स्पष्ट केली आहे . ती म्हणाली की, ज्योती माझी फक्त एक यूट्यूब मैत्रीण होती . तिच्या कोणत्याही गुन्हेगारी कृत्यांबद्दल मला माहिती नव्हते . जर मला माहित असते की ती शत्रू देशासाठी हेरगिरी करत आहे, तर मी तिच्याशी कोणताही संपर्क ठेवला नसता . प्रियांका पुढे म्हणाली की, मी ज्योतीला व्यावसायिक कंटेंटवरून ओळखत होते . वैयक्तिकरित्या, मला या बातमीने धक्का बसला आहे . मी तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे . ज्योतीच्या अटकेनंतर आणि प्रियांकाच्या चौकशीनंतर, गुप्तचर संस्थांनी पुरी, भुवनेश्वर आणि इतर पर्यटन स्थळांची सुरक्षा वाढवली आहे . विशेषत :, ड्रोन, डीएसएलआर आणि व्यावसायिक कॅमेरे वापरून सार्वजनिक ठिकाणी शूट करणाऱ्या कंटेंट क्रिएटर्सवर लक्ष ठेवले जात आहे .

सुरक्षा तज्ज्ञांचे म्हणणे आहे की हे प्रकरण एका नवीन प्रकारच्या धोक्याकडे निर्देश करते ज्यामध्ये सायबर-एजंट माहिती गोळा करण्यासाठी आणि पाठवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करत आहेत . एका सुरक्षा अधिकाऱ्याने सांगितले की आजचा गुप्तहेर कोणत्याही सीमेवरून येत नाही, तो तुमच्या फोनच्या स्क्रीनमागे आहे . तपास यंत्रणांच्या मते, हे प्रकरण एखाद्या मोठ्या कटाचा भाग असू शकते आणि त्याच्या तळाशी जाण्यासाठी ओडिशापासून हरियाणापर्यंत अनेक ठिकाणी तपास सुरू आहे . जर तपासात असे आढळून आले की, प्रियंका सेनापती या प्रकरणात कुठल्याही प्रकारे सहभागी आहे तर तिला देखील अटक होऊ शकते . सध्या, प्रियंका आणि ज्योतीची संभाषणे, सोशल मीडियावरील संवाद आणि डेटा शेअरिंगचा सखोल तपास केला जात आहे .

# माजलगाव येथे तब्बल 33 वर्षांनी ‘पुन्हा एक दिवसाची शाळा’ भरली

➤ **माजलगाव / अरविंद ओव्हाळ :** तालुक्यातील तालखेड येथील सिंधफणा माध्यमिक विद्यालयाच्या सन- १९९२ च्या इय्यता दहावी वर्गातील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा माजलगाव येथील हॉटेल शिवसागर येथे नुकताच अतिशय आनंदाच्या वातावरणात पार पडला .

तब्बल ३३ वर्षानंतर शालेय जीवनातील गंमती- जमती, मौजमजा, शिक्षकांच्या छडीचा प्रसाद हे सर्व काही काळाच्या ओघात आणि प्रपांच्या व्यापात विस्मृतीत जाणाऱ्या आठवणींना उजाळा देण्यासाठी दिनांक १८ मे २०२५ रोजी एकत्रित येवुन "पुन्हा एक दिवसाची शाळा" भरविण्यात आली . यामध्ये त्यावेळेसचे विद्यार्थी आणि आत्ताचे शिक्षक, डॉक्टर आणि विविध क्षेत्रातील व्यावसायिक बरोबरच आजी- आजोबा असलेल्या जवळपास ३५ ते ४० उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुछ देऊन स्वागत करण्यात आले . यावेळी अरविंद मनोर, रोहित जोशी, राजेंद्र तौर, शिवाजी पाटील, मंदा चोपकर, दुर्गा बियाळे, सुवर्णा चांडक, संगीता कदम यांनी बालपणीच्या आठवणींना उजाळा देऊन कार्यक्रमात चांगलीच रंगत आणली . तसेच यावेळी सर्वांनी एकत्रित स्नेह भोजनाचा येथेच्छ आस्वाद घेऊन आयोजकांना मनापासून धन्यवाद दिले .

सदरील "पुन्हा एक दिवसाची शाळा" हा उपक्रम राबविण्यासाठी शेख तय्यब, अंगद कवडे, हरीश जावळे, यांनी अतिशय परिश्रम घेऊन आयोजन करण्यात होते तर कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन अंगद कवडे यांनी केले . यामध्ये पुणे येथून सुशील मुंदडा, अरविंद मनोर, रोहित जोशी, महारुद्र माडेकर तसेच परभणी जिल्ह्यातील सय्यद सलीम, सुवर्णा बाहेती, गोंदिया जिल्ह्यातून मंदा चोपकर, संभाजीनगर येथून बाबासाहेब ओव्हाळ तसेच जिल्ह्यातील सदाशिव बचाटे, शिवाजी वानरे, भरत तौर, मदन तौर, सतीश लड्डा, जमीर शेख, बाबू जाधव, ज्ञानोबा लबासे, सचिन ढोंबरे, गंगाराम होके, भागुबाई रिंगणे, योगिता मेखे, शेख शबाना, संगीता कदम, अनिता लाटे आणि अर्चना ढोंबरे यांनी सहभाग नोंदविला होता .



# सामाजिक कार्यकर्ते पत्रकार समीर शेख यांच्या भाचीचा विवाह सोहळा थाटात संपन्न

आष्टी : प्रतिनिधी

आष्टी पाटोदा, शिरूर तालुक्याच्या कानकोपऱ्यात, प्रशासकीय, सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रात व्यापक जनसंपर्क असलेले सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार समीर शेख यांच्या भाचीच्या विवाह प्रसंगी विविध क्षेत्रातील मित्र परिवार, स्नेही मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या .

या शुभप्रसंगी पाटोदा मा . नगराध्यक्ष आदम सय्यद, नगरसेवक आसिफ सौदागर, नगरसेवक श्रीहरी गीते, नगरसेवक नय्युम पठाण, सरपंच दत्तात्रय खोटे, मा .सरपंच विठ्ठल राख, शामीर भाई सय्यद, ह .भ .प विजय महाराज राजपुरे, ह .भ .प अशोक महाराज काकडे, विजय मरकड, उपसरपंच शेषराव भोसले, गणेश खिलारे, जयराम झिंजुर्के, कल्याण राऊत, जितेंद्र भोसले, धांडे सर, विशाल अर्सुळ ,आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पाटोदा तालुका मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सोमनाथ कोल्हे, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष अब्दुल कादर मकराणी, तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षकतर संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजूभाई पठाण, पाटोदा तालुका परिषदेचे उपाध्यक्ष जावेद शेख, पत्रकार हमीद पठाण, पत्रकार पोपट कोल्हे, ज्येष्ठ पत्रकार गहिनीनाथ पाचबैल, पत्रकार अक्षय विधाते, पत्रकार संतोष नागरगोजे, पत्रकार मारुती संत्रे पत्रकार शेख महेशर, पत्रकार राजेंद्र लाड, रामकिसन गिते सर, पत्रकार विजय जाधव पत्रकार सतीश गर्जे, पत्रकार सचिन शिंदे, पत्रकार सज्जाद, पत्रकार अजीज भाई, सय्यद, सय्यद मिस्तरी, छगन भगत, सुनील सानप, शकील शेख, बशीर भाई शेख , अन्सार शेख, युनुस शेख, इस्राईल शेख, सद्दाम शेख, नवाज मुलाणी, आयुब पठाण, आदी मान्यवर यांनी उपस्थित राहून वधूवराला शुभेच्छा दिल्या यावेळी समीर शेख यांनी दोन्ही परिवाराच्या वतीने सर्वांचे आभार मानले .







# अंशत : अनुदानित शाळा टप्पा वाढीची अंमलबजावणी पावसाळी अधिवेशनात : उपमुख्यमंत्री अजित पवार

● पान १ वरून . . . यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील सर्व विनाअनुदान आणि अंशत : अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीचा निर्णय आपणच घेतला आहे . काही कारणास्तव निधी उपलब्ध झालेला नाही ; परंतु येत्या पावसाळी अधिवेशनात राज्यातील सर्व विनाअनुदानित शाळासह अंशत : अनुदानित शाळांच्या वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या भरीव अशा आर्थिक निधीची तरतूद करून वाढीव टप्प्याचे अनुदान मंजूर करून तुमचा प्रलंबित राहिलेला प्रश्न मार्गी लावणार असल्याचे ना . अजित पवार यांनी या वेळी सांगितले .

त्यामुळे येत्या पावसाळी अधिवेशनात वाढीव टप्प्याच्या निधीची तरतूद होऊन खूप दिवसांपासून टप्पा वाढीचा असलेला हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याचे संकेतच अजित पवार यांनी दिल्याने विनाअनुदानित आणि अंशत : अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात चैतन्याचे वातावरण तयार झाले आहे .

ना . अजित पवार यांना निवेदन देताना महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष श्री . जितेंद्र डोंगरे सर, बीड जिल्हाध्यक्ष श्री . आत्माराम वाव्हळ सर, श्री .शिवप्रसाद शिरसाट सर, श्री . संजय देवा कुलकर्णी आदी बहुसंख्येने शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते .

## प्रहार पक्षाच्यावतीने शोले स्टाईल आंदोलन

● पान १ वरून . . . नगर परिषदेकडून मिळत असणाऱ्या पाच टक्के निधी मध्ये वाढ व्हावी या मागणी करता, प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लगत असणाऱ्या पाण्याच्या टाकीवर चढून प्रहार चे अध्यक्ष अनिल गांगुर्डे यांनी नेतृत्व केले . घटनास्थळी नगर परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी आंदोलनाच्या ठराविक मागण्या मान्य करून निवेदन घेतले . घटना स्थळी कन्नड नगर परिषदेचे कर्मचारी शितल चौधरी, वैशाली दाभाडे , प्रतिभा कदम, पवन परदेशी, रमेश थोरात बाजीराव, देवदास पाटील, रवि राजोरा , भाले, अविनाश कांगरे, इतर कर्मचारीतसेच प्रहार जनते पक्षाचे दिव्यांग बांधव उपस्थित होते .

## धनंजय मुंडे यांच्या मागणीला यश!

● पान १ वरून . . . निर्देश संबंधित यंत्रणांना दिले आहेत .

माजी मंत्री आ . धनंजय मुंडे यांनी याबाबत सातत्याने मागणी केली होती, त्यानुसार या प्रस्तावाच्या अनुषंगाने आज संबंधित अधिकारी यांनी अजितदादा पवार यांच्या समक्ष सादरीकरण करण्यात आले . त्यानंतर त्यांनी या सर्वच मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले .

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आज औष्णिक विद्युत केंद्रातील विविध मागण्यांसह परळी वैद्यनाथ येथील श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या कामांचाही समग्र आढावा घेण्यात आला . माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या सहमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नातून वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थस्थळाच्या व परिसराच्या विकासासाठी राज्य सरकारकडून 286 .68 कोटी रुपयांच्या आराखड्यास मान्यता दिल्यात आलेली असून यातून विविध विकास कामे सुरु आहेत . या कामांना निधीची कमतरता कुठेही भासू देणार नाही मात्र अत्यंत दर्जेदार पद्धतीने व ठराविक वेळ येथे कामे पूर्ण केली जावीत असे अजित दादांनी स्पष्ट केले .

बैठकीस अजितदादांसह मंत्री पंकजाताई मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे, आयुक्त राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांसह संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते . दरम्यान धनंजय मुंडे यांनी या मागणीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल उपुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत .

# पैठण तालुक्यात कामगारांना मोफत भांडे वाटप कॅम्पच्या नावाखाली मोठा स्कॅम ! !


**पैठण : सर्जेराव खडसन**

महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे अधिकृत नोंदणी केलेल्या बांधकाम कामगारां साठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत . त्यामध्ये आरोग्य सेवा त्यांच्या पाल्यांना स्कॉलरशिप व ईतर अनेक योजना राबवल्या जातात . तसेच या योजनेत बांधकाम कामगारांना घरगुती वापरातील भांड्याचा संच मोफत वाटप करण्यात येत आहे . कामगारांसाठी असलेली ही योजना पुरती दलालांनी आपल्या हातात घेतली आहे . मागील चार ते पाच दिवसापासून शहरातील भाजीमार्केट परिसर, पोस्ट ऑफिस रोड, जूने पावर हाऊस तसेच बिडकीन लोहगाव, पिंपळवाडी ( पि ) सोनवाडी, तांदुळवाडी नाराळा या भागात जिल्ह्याच्या व तालुक्यातील काही तथाकथित कामगार संघटनेच्या दलालांनीभांडे वाटप करण्याच्या कॅम्पच्या नावाखाली थंब घेत लाखो रुपयांचा मोठा स्कॅम होत असल्याच्या तक्रारी काही लोकांनी बोलून दाखवल्या आहेत .



पैठण तालुक्यातील काही राजकिय व तथाकथित कामगार संघटनांचे दुकान टाकून बसलेल्या निर्ढावलेल्या दलालांनी नोंदणीकृत कामगारांना सरकारकडून मोफत भांड्याचा संच वाटप करण्याची योजनाच आपल्या हातात घेतल्याचे चित्र दिसत आहे . या निर्ढावलेल्या दलालांनी तालुक्यातील नोंदनीकृत गोर गरीब व गरजू कामगार महीला व पुरुषांना तुम्हाला भांड्याचा संच मिळवून देतो असे म्हणत बिडकीन, लोहगाव, जूने पावरहाऊस, पिंपळवाडी ( पि ) सोनवाडी, तांदुळवाडी, नाराळा, पैठण ते पाटेगाव रोडवर काही ठरावीक व बंदिस्त ठिकाणी या दलालामार्फत भांड्याचा कॅम्प घेतला जात आहे . व हे दलाल राज्य सरकारकडून बांधकाम कामगारांना मोफत वाटप करण्यात येणाऱ्या घरगुती वापरातील भांड्याचा संचासाठी प्रती कामगार सर्रासपणे १५०० ते २००० हजार रुपये जमा करून लाखो रुपयांची आर्थिक लूटमार करीत असल्याचे दिसत आहे . परंतु शासनाकडून बांधकाम कामगारांना मोफत भांड्याचा संच वाटप करण्याची जबाबदारी ज्यांच्याकडे दिली आहे त्यांच्यासह जिल्हा व तालुका कामगार मंडळाचे अधिकाऱ्यांना तालुक्यातील गोरगरीब बांधकाम कामगारांची या दलालांकडून होणारी लाखो रुपयांची आर्थिक लुट उघड्या डोळ्यांनी दिसत असूनसुद्धा ती रोखन्याकरिता कोणत्याही प्रकारची उपाय योजना करताना दिसत नाही . त्यामुळे तालुक्यातील काही राजकिय व तथाकथित कामगार संघटनेच्या दलालांना हाताशी धरून बांधकाम कामगारांना मोफत भांडे वाटप करण्याच्या नावाखाली कॅम्प घेत लाखो रुपयांचा होत असलेल्या स्कॅम हा मिळून मिसळून होत असल्याचे प्रथमदर्शनी तरी दिसून येत आहे .त्यामुळे या "कॅम्प च्या नावाखाली स्कॅम"ची सखोल चौकशी व्हावी व बांधकाम कामगारांची होणारी आर्थिक फसवणूक तात्काळ थांबवावी अन्यथा पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्या वतीने कामगार उपआयुक्त यांच्या कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात येणार असल्याची माहिती पक्षाचे मराठवाडा उपाध्यक्ष दशरथ भाई आडसुळ तसेच पैठण तालुका अध्यक्ष संजय खडसन यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे .

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष




# अकरावी ऑनलाईन प्रवेश नोंदणीसाठी मदत केंद्र

माजलगाव / प्रतिनिधी : यावर्षीपासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात ११ वी वर्गाचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत . विद्यार्थ्यांना ११ वी वर्गाच्या ऑनलाईन प्रवेशासाठी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मदत केंद्र कार्यान्वित राहणार आहे .विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश नोंदणी करण्यासाठी सहकार्य व्हावे म्हणून सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागामध्ये ११ वी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेची प्रवेश नोंदणी करण्यासाठी मदत केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे . सदरील केंद्रावर येऊन १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी प्रवेश करावा आणि मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . जी .के . सानप यांनी केले आहे .

## अक्षरा सुभाष टाकणखार दहावी बोर्ड परिक्षेत 84.40 टक्के मार्क घेऊन उत्तीर्ण



माजलगाव : अक्षरा सुभाष टाकणखार दहावी बोर्ड परिक्षेत कुठल्याही प्रकारची शिकवनी वर्ग न लावता फक्त शाळेत व घरी बसून अभ्यास करून विशेष प्राधान्यामध्ये पास झालेली आहे . अत्यंत खडतर परिस्थितीमध्ये जिद्दीने तीने हे यश संपादन केले आहे . दहावीच्या परिक्षेत 84 .40 टक्के मार्क घेऊन पास झाल्याबद्दल तीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

# बोरघर बौद्धजन सेवा संघ आयोजित तीन दिवसीय संयुक्त जयंती विविध उपक्रमाने साजरी



बोरघर : विश्वास गायकवाड
रायगड जिल्ह्याच्या माणगांव तालुक्यातील बोरघर बौद्धजन सेवा संघाच्या वतीने गुरुवार ते शनिवार दिनांक १५ , १६ आणि १७ मे या तीन दिवसीय कालावधीत तथागत भगवान गौतम बुद्ध आणि विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव २०२५ चे शानदार आयोजन बोरघर बौद्धवाडी या ठिकाणी करण्यात आले होते .

या वर्षी बोरघर बौद्धजन सेवा संघाचे सर्व स्थानिक आणि मुंबईकर आणि महिला मंडळ विद्यमान,आजी माजी पदाधिकारी, सभासद, संयुक्त जयंती उत्सव कमिटी आणि युवक युवती यांच्या नियोजनबद्ध आखणीतून सदर संयुक्त जयंती महोत्सव सोहळा २०२५ च्या पार्श्वभूमीवर विविध उपक्रमांचे सु नियोजन करण्यात आले होते . या मध्ये प्रामुख्याने बुद्ध वंदना, मनोगत, विद्यार्थी गुणगौरव, मान्यवरांचे स्वागत, रांगोळी स्पर्धा, भव्य शोभायात्रा, प्रश्नमंजुषा, विद्यार्थी कलाभिनय, मनोरंजनात्मक कार्यक्रम, विविध गुणदर्शन, विविध प्रकारच्या क्रिडा स्पर्धा, नृत्य स्पर्धा, पाककला, स्नेह भोजन सांस्कृतिक कार्यक्रम, मॅरेज एनिव्हर्सरीज सिलेब्रेशन इत्यादी उपक्रमांची अविस्मरणीय पर्वणी होती .

सदर संयुक्त जयंती उत्सवातील प्रमुख लक्षवेधी बाब म्हणजे शोभायात्रेत आयोजकांनी तथागत भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज आणि विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांची विद्युत रोषणाई केलेल्या यांत्रिक आकर्षक सोनेरी रथातून आणि डीजे च्या गगनभेदी आवाजात भिमगीतांच्या तालावर ठेका धरत संपूर्ण गावातून वाजत गाजत काढलेली भव्य मिरवणूक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती . सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बोरघर बौद्धजन सेवा संघाच्या स्थानिक व मुंबईकर विद्यमान, आजी माजी पदाधिकारी, संयुक्त जयंती उत्सव कमीटी, युवक, युवती आणि महिला मंडळ यांनी अथक परिश्रम घेतले .

उपदेशकथा

## थांबला तो संपला

तीन मित्र पायी प्रवासाला निघाले होते . डोंगर-द-यांमधून ते खूप चालले होते . उन्हामुळे अंगाची लाही लाही होत होती . त्यांच्याजवळचे पाणी संपले होते . पाणी कुठून आणावे ते त्यांना कळेना . सभोवताली त्यांनी खूप शोध घेतला . ते डोंगरावर चढले आणि वरून खाली पाहून पाण्याच्या साठ्याचा शोध घेऊ लागले . इतक्यात त्यांना एक झरा दिसला . त्यातला एक प्रवासी पाणी पाहून ओरडला, ' अरे, खाली कोणी आहे का, आम्हाला जरा पाणी आणून द्याल ? आम्हाला खूप तहान लागली आहे . ' दुसरा म्हणाला, ' हा झरा इतक्या खाली का आहे ? आता कोण तिथे जाणार ? आताच जीव मेटाकुटीला आला आहे . त्यातून तिथपर्यंत जायचे म्हणजे ? ' या दोघांच्या बोलण्याकडे थोडेदेखील लक्ष न देता तिसरा झऱ्याजवळ गेला आणि पोटभर पाणी पिऊन आलाही . तोपर्यंत हे दोघे नुसताच विचार करत बसले होते ; तिसरा प्रवासी म्हणाला, ' तुम्ही बसा, मी जातो आता पुढच्या प्रवासाला, कारण जो थांबला तो संपला . . . ' असे म्हणून तो त्या दोघांना सोडून निघालाही .

कथा उपदेश : जीवनाची उमेदवारी म्हणजे शिक्षण .

# राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याची दुरुस्ती करा

➤ पावसाळ्यापूर्वी रस्ता दुरुस्त न केल्यास आंदोलन करणार - होके पाटील



### रस्ता दुरुस्तीसाठी आंदोलनाचा दिखावा केला

● एक वर्षापूर्वी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून आ .प्रकाश सोळंके यांनी सत्तेत असूनही .रस्ता दुरुस्तीसाठी आंदोलनाचा दिखावा केला . परंतु आता परत हा रस्ता जैसे थै अवस्थेत असताना आ .सोळंके मात्र यावर चकार शब्द बोलत नाहीत .

,माजलगाव / प्रतिनिधी : शहरातुन गेलेला खामगाव पंढरपूर हा पालखी महामार्ग वारकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेल्या या रस्त्यावर माजलगाव ते तेलगाव दरम्यान अनेक ठिकाणी भेगा पडून रस्ता फाटला असल्याने आपघाताचे प्रमाण वाढले आहे .

त्यामुळे या महामार्गावरील रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष नारायण होके पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन केली .

पुढे दिलेल्या निवेदनात ते म्हणाले सदरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असून रस्त्यावर मोठ मोठ्या भेगा पडल्यामुळे दुचाकीस्वारांना आपला जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे तर . पावसाळ्यात या पडलेल्या भेगामध्ये पाणी साचल्यास मोठ्या प्रमाणात अपघात होऊन निष्पाप नागरिकांना गंभीर दुखापत किंवा जीव
देखील गमवावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही .
त्यामुळे पालखी महामार्गावरील माजलगाव ते तेलगाव दरम्यानचा रस्ता पावसाळ्यापूर्वी डागडुजी करून वाहन चालकांना भयमुक्त प्रवास करण्यास मदत करावी व अपघात टाळण्याचे काम करावे . नसता लोकहिताचे या प्रश्नावर काँग्रेस पक्षाच्या वतीने मोठं आंदोलन करण्याचा इशारा तालुका अध्यक्ष नारायण होके पाटील शहराध्यक्ष अफरोज तांबोळी दत्ता कांबळे ऍड इनामदार विनोद सुरवसे शेख जानुशा शेख अहेमद कृष्णा शिंदे विठ्ठल कांबळे बिभीषण साबळे संदिप भरडकर यांच्या सह कार्यकर्त्यांनी दिला .

# प्राचार्य अन्वर शेख यांची सिबीएसई च्या जिल्हा प्रशिक्षण समन्वयक पदी निवड



माजलगाव / प्रतिनिधी : येथील विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूल चे प्राचार्य अन्वर शेख यांची केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या ( सीबीएसई ) तर्फे जिल्हा प्रशिक्षण समन्वयक ( डीटीसी ) पदी निवड करण्यात आली आहे . त्याबद्दल अन्वर शेख यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे .

सविस्तर वृत्त असे की या निवडीची माहिती सीबीएसईच्या पुणे विभागीय कार्यालयाकडून दि . १९ मे २०२५ रोजी पत्राद्वारे देण्यात आली . त्याचबरोबर महावीर इंग्लिश स्कूल कडा आष्टी, बीड येथील प्राचार्य श्री . अभिलाष कुडियाथू यांची उप जिल्हा प्रशिक्षण समन्वयक ( डीडीटीसी ) पदी निवड करण्यात आली आहे . या दोन्ही शिक्षणतज्ञांच्या निवडीमुळे बीड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात नवी चैतन्यता निर्माण होणार आहे . सीबीएसईच्या पुणे केंद्राच्या प्रमुख/ उप सचिव डॉ . मृदुला सिंह यांनी पाठवलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, दोन्ही प्राचार्यांची पात्रता, अनुभव आणि कौशल्य या पदांसाठी अतिशय योग्य आहे . त्यांना बीड जिल्ह्यात सीबीएसई पुणे केंद्राच्या सर्व शैक्षणिक आणि प्रशिक्षण कार्यक्रमांना पाठिंबा देण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे . या पदाच्या अंतर्गत त्यांना जिल्ह्यातील सीबीएसई संलग्न शाळांच्या शैक्षणिक उत्कर्षासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अंमलबजावणीत सहकार्य करणे आणि शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे . बीड जिल्ह्यातील शैक्षणिक वर्तुळात या निवडीचे स्वागत करण्यात आले आहे आणि या दोन्ही शिक्षणतज्ञांकडून जिल्ह्यातील सीबीएसई शाळांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे .

या निवडीबद्दल सिंदफणा पब्लिक स्कूलचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके, समन्वयक महिला देशमुख, उपप्राचार्य राहुल कदम, शैक्षणिक विभाग प्रमुख जीबी ऑगस्टन, सुनिता सुरवसे, धनंजय सोमवंशी, अर्चना जाधव, देवेंद्र सोळंके, प्रदीप बुरकुल पत्रकार अरविंद ओव्हाळ व पत्रकार विष्णू दादा उगले यांच्यासह सर्व पालकवृंद, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्राचार्य अन्वर शेख यांचे अभिनंदन केले .

http ://epaper .beedvastav .com
https ://www .beedvastav .com

# आता मनसे राबवणार रोषणपुरी ते छोटेवाडी रस्त्याचे मजबुतीकरण होईपर्यंत उपोषण मोहीम - धोंडीराम जाधव




माजलगाव : काल दि १९ रोजी मनसे ने दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, दि .३०ऑगस्ट २०२४ रोजी नॅशनल हायवे रोषणपुरी फाटा या ठिकाणी या रस्त्या संदर्भात रस्ता रोको आंदोलन करण्यात आलेले होते . त्यावेळी त्यांनी संबंधित कार्यालयाने लेखी आश्वासन दिले होते की, पाऊस संपताच आम्ही या रस्त्याचे मजबुतीकरण करुन देऊत .मात्र या गोष्टी चा संमधीत विभागाला पुर्णत : विसर पडला आहे त्यांनी आजतागायत त्या रस्त्यावर कुठल्याही प्रकारचे काम केलेले नाही . पाऊस पडल्यानंतर त्या रस्त्याने जाता येत नाही व शेतीची मशागत करता येत नाही . ( शेतकऱ्यांना वाहने नेता येत नाहीत . बैलगाडीपण जात नाही . खत, बियाणे नेता येत जलगाव एवढेच नाही तर पायी पण त्या रस्त्याने जाता येत नाही . आशी आवस्था त्या म .म ज . याची होते . यासाठी आम्ही संबंधित कार्यालयात कळविलेले आहे व आंदोलनही केलेले आहे . तरी या रस्त्याकडे दुर्लक्ष होत आसल्यामुळे सर्व शेतकऱ्यासह महाराष्ट्र नवनिर्माण सेनचे महाराष्ट्र सैनिक हे दि .२३ मे २०२५ रोजी बुवाजीबुवा महाराज यांच्या पादुका या ठिकाणी मनसे स्टाईल उपोषण करणार आहोत . तरी यात काही अनुचित प्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यालयावर राहील .असे दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे निवेदना वर धोंडीराम जाधव ,गणेश वाघमारे ,आत्माराम ढिसळे, पांडुरंग जाधव, कैलास जाधव ,नितीन गावडे ,अशोक आगे आदी सह सुमारे पन्नास ते साठ जणांच्या साह्या आहेत .

# भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल कारीच्या ओमकार मोरेची ग्रामस्थांनी काढली मिरवणुक

**माजलगाव : अरविंद ओव्हाळ**
भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल कारी येथील ओमकार सोमनाथ मोरे याची कारी ग्रामस्थांनी डिजेच्या तालसुरात वाजतगाजत गावातुन मिरवणुक काढत, त्याला शुभेच्छा देत आनंदोत्सव साजरा केला .

कारी ता .धारूर येथील रहिवाशी व तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात नोकरीस असलेले सोमनाथ मोरे यांचा मुलगा ओमकार सोमनाथ मोरे हा नुकताच भारतीय सैन्य दलात भरती झाला .



ओमकार हा गेल्या कांही दिवसांपासुन सैन्यात भरती होण्यासाठी सराव करत होता .तो यापुर्वी भरती झाला होता . मात्र केवळ एका गुणामुळे त्याची संधी हुकली होती .या प्रकाराने खचुन न जाता पुन्हा नव्या जोमाने, नव्या उमेदीने त्याने अभ्यास व सराव कायम चालुच ठेऊन सैन्यात भरतीचा प्रयत्न चालुच ठेवला होता . आणि त्याच्या प्रयत्नाला यश मिळुन, तो भारतीय सैन्य दलात भरती होऊन, भारतीय जवान बनला .ओमकार मोरे भारतीय सैन्य दलात भरती झाल्याचे कारी गावात समजताच ग्रामस्थांनी रविवार दि .१८ मे रोजी सकाळी त्याची डिजे च्या तालासुरात व फटाक्यांच्या आतषबाजीत गावातुन भव्यदिव्य मिरवणुक काढत आनंदोत्सव साजरा करत, ओमकारच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देत त्याचे अभिनंदन केले .

### आई वडीलांच्या आशिर्वादाने यश मिळवु शकलो - ओमकार मोरे



लहानपणापासुनच मला भारतीय सैन्य दलात जाऊन देशसेवा करण्याची इच्छा होती .ही इच्छा मी आईवडीलांना अनेक वेळा बोलुन दाखवली . त्यामुळे त्यांनीही माझी ईच्छा पुर्ण करण्यासाठी वेळोवेळी मला प्रोत्साहन देत मार्गदर्शन केले .तसेच संघर्ष ॲकडमीचे संचालक ज्ञानेश्वर क्षीरसागर यांनी ही मोलाचे मार्गदर्शन केले .त्यांच्या प्रोत्साहन व आशिर्वादामुळेच मी आज हे यश मिळवु शकलो .

### आमच्या परिवारासाठी हा खुप मोठा आनंद - सोमनाथ मोरे



माझ्या मुलांचे व मुलींचे पोलीस अथवा सैन्य दलात भरती होऊन देशसेवा करण्याचे स्वप्न होते .त्यात आमची मोठी मुलगी रूपाली ही महाराष्ट्र पोलीस दलात भरती होऊन, आज पिंपरी चिंचवड येथे महिला पोलीस म्हणुन कार्यरत आहे .तर मोठा मुलगा ओमकार हा सुध्दा आता भारतीय सैन्य दलात भरती झाला .आमच्या परिवारासाठी हा खुप मोठा आनंद असुन, दुसरी मुलगी व मुलगा ते दोघेही पोलीस व सैन्य दलात भरतीसाठी प्रयत्न करत असुन, आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने तेही लवकरच भरती होतील . अशी भावना सोमनाथ मोरे व सौ .शितल सोमनाथ मोरे या पती पत्नीने व्यक्त केली .

# 90 टक्के गुण मिळवत मानसी सचिन शहागडकर हिचे यश



बीड : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च 2025 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत बीड येथील संस्कार विद्यालयाची विद्यार्थिनी कु . मानसी सचिन शहागडकर हिने 90 .40 % गुण मिळवत प्रथम येवून घवघवीत यश संपादन केले आहे .

मानसी च्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे . ती लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार असून तिने विविध शिकवणी मध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे . तिच्या या यशामागे तिची चिकाटी, मेहनत, पालकांचे मार्गदर्शन व शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगण्यात येत आहे . माजी मंत्री जयदत्त आणा क्षीररसागर, शिवसेना जिल्हाप्रमुख अनीलदादा जगताप, रा .काँ .श .प . पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, भाजपा जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, भाजपा नेते नवनाथ आणा शिराळे, प्रोफेशनल क्लासेस चेरमन अध्यक्ष पवार सर यांच्या सह शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोहर धोंडे यांनी मानसीचे अभिनंदन करून तीला पुढील शैक्षणिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या तर संस्कार विदयालयचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंदांनी मानसी चे अभिनंदन करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत .

केलेल्या बोगस कामांची चौकशी करा

➤ सय्यद सलीमबापू यांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

# मुख्याधिकारी चव्हाण यांच्या भ्रष्ट कारभाराची पोलखोल करणारी त्रीसदस्यी समिती पुनर्गठीत करा



माजलगाव / प्रतिनिधी : येथील नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्या भ्रष्ट कारभाराची पोलखोल करणारी त्रीसदस्यी समिती पुनर्गठीत करा .व चव्हाण यांना पाठीशी घालणाऱ्या एसडीओ माजलगाव यांचीही चौकशी करा .नसता गुरुवार दि .२२ रोजी जिल्हाधिकारी बीड यांच्या कार्यालया समोर उपोषण करण्याचा इशारा सय्यद सलीमबापू यांनी दिला आहे .

आंबेडकरी विचार मोर्च्याचे जिल्हाध्यक्ष एड .ए .एन .सय्यद यांनी दि .२७ जुन २०२४ रोजी माजलगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व इंजिनीयर तसेच गुत्तेदार यांनी संगनमत करुन २ वर्षात कोट्यावधी रुपयांचे सिमेट रस्ते, नाली, घनकचरा, नगर परिषद फंड, गुंठेवारी व रजिस्ट्री ऑफीसची १ टक्के रक्कम तसेच ओपन स्पेसची जागा, डीपी रोड या कामामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे .व या सर्व प्रकाराचे मुख्य सूत्रधार मुख्याधिकारी प्रशासक चंद्रकांत चव्हाण आहेत .यावर तात्काळ त्रीसदस्यी समिती गठीत करुन इंस्टिमेट प्रमाणे काम न झाल्यामुळे कॉलेटीकंट्रोल द्वारे गुणवत्तेनुसार चौकशी करावी .तसेच एकच रस्ता दहावेळा करण्यात आला याची देखील चौकशी करावी .

अशी तक्रार तत्कालीन जिल्हाधिकारी मुधोळ मॅडम यांना दिली होती . त्यानुसार मुधोळ मॅडम यांनी ५ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्याधिकारी चव्हाण यांचेविरुध्द त्रीस्तरीय समिती घटीत केली होती .या समितीमध्ये समितीचे अध्यक्ष म्हणुन उपविभागीय अधिकारी माजलगाव . सदस्य कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई .दुसरे सदस्य व लेखाधिकारी, अंतर्गत लेखापरिक्षण जिल्हाधिकारी बीड यांना सदस्य सचिव म्हणुन नेमणुक केली होती .तसे आदेश जिल्हा सहआयुक्त व जिल्हाधिकारी बीड यांनी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना पत्र काढले .परंतु पत्र काढून देखील अधिपविभागीय अधिकारी माजलगाव यांनी अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही अथवा समितीची चौकशी केली नाही . त्यामुळे माजलगाव नगरपरिषदेतील भ्रष्टाचाराचा कळस सतत वाढत राहिला आहे .

तसेच नगरपरिषदेच्या भ्रष्टाचाराचे जनक चंद्रकांत चव्हाण यांच्या भ्रष्ट कारभारावर उपविभागीय अधिकारी माजलगाव यांनी पडदा टाकला .त्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी मुधोळ मॅडम यांनी चंद्रकांत चव्हाण यांच्या भ्रष्ट कारभाराची पोलखोल करणारी त्रीसदस्यी समिती पुनर्गठीत करावी व चव्हाण यांना पाठीशी घालणाऱ्या उपविभागीय अधिकाराच्या कारभाराचीही चौकशी करावी नसता गुरुवार दि .२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे उपोषण करणार असल्याचा इशारा समाजसेवक सय्यद सलीमबापू यांनी निवेदनाद्वारे दिला आहे .

या निवेदनावर आंबेडकरी विचार मोर्च्याचे जिल्हाध्यक्ष एड .ए .एन . सय्यद यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत .